माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : ८०/२०१९**

**अपिलार्थी, श्री.अजय डालुरामजी बोरेले,**
**रा.पुष्पकुंज सोसायटी, वडगाव रोड, यवतमाळ**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ**

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०६.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६.०७.२०१८ | ०८.०१.२०१९ | ०४.१०.२०१८ | -- |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १६.०७.२०१८** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " सा.बा.उपविभाग उमरखेड येथील उपविभागीय अधिकारी श्री.वानखडे यांचे कारकिर्दीत हाताळलेल्या कामाची विस्तृत माहिती खालील प्रमाणे देण्यात यावी. १. बांधकामाची नावे, निविदा किंमत, करारनामा किंमत, कंत्राटदाराची नावे, २. प्रत्येक बांधकामाच्या अंतिम देयकाची साक्षांकित छायाप्रती. ३. प्रत्येक कामातील चाचणी अहवालाच्या प्रती, ४. डांबरी कामात वापर केलेल्या डांबरगेट पासच्या छायांकिती प्रती, ५. दक्षता गुण नियंत्रण विभागाच्या प्रत्येक कामानिहाय आवश्यक दौरा टिपणी इत्यादी माहिती" मागितलेली आहे. सदरचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांनी दि.२६.०७.२०१८ चे पत्रान्वये उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उमरखेड यांना पाठविला. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांनी त्यांच्या दि. ०८.०१.२०१९ च्या पत्रान्वये करारनामा यादी पुर्विण्यात आली व उर्वरित माहिती उपलब्ध असलेली विस्तृत स्वरुपाची माहिती असल्यामुळे पुरविणे शक्य नसल्यामुळे, सदर माहितीचे अवलोकन करण्यासाठी कार्यालयात दि. २१.०१.२०१९ रोजी बोलाविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी व्यथित होवून

**दिनांक ०४.१०.२०१८ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे बाबत पत्र व्यवहार करण्यात आले नाही, जन माहिती अधिकारी पुसद यांचे कार्यालयीन पत्र दि.२६.०७.२०१८ चे पत्रानुसार २० दिवसात संबंधित उपअभियंता सा.बां.उपविभाग उमरखेड यांच्यावर माहिती देण्याची जबाबदारी टाकले असुन सदर उपविभागामार्फत माहित पुरविण्यात आली नाही, दि.२८.०९.०१८ रोजी स्मरणपत्राचे जन माहिती अधिकारी पुसद कडुन उत्तर न दिल्याने व माहिती लपवुन झालेली अनियमितता लपविण्याचा प्रयत्न होत असल्याने" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.१२.२०१८ चे पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम ०५ चे कलम ७ पोटकलम (१) (घ) अन्वये अपिल अर्ज फेटाळण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०१.२०१९ रोजी** "माहिती न देणे, प्रथम अपिल ३० दिवसात निकाली न काढणे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक **३०.०६.२०२३** रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी श्री.अजय डालुरामजी बोरेले उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री.अनिल रामचंद्र राठोड उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी श्रीमती प्रिया दिनकर पुजारी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी श्री.अजय बोरेले यांनी दाखल केलेला व्दितीय अपिल अर्ज मंजुर करित अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी याआधीच नमुद केल्याप्रमाणे जोडपत्र अ मधील नमुद विषयांकित माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे त्यातील केवळ करारनाम्याची प्रत प्रदान करण्यात आली असुन, उर्वरीत माहितीचे अवलोकनाकरीता अपिलार्थी यांना आमंत्रित केले होते. मात्र अपिलार्थी यांचे म्हणण्यानुसार हा संपुर्ण प्रकार केवळ उपलब्ध असलेली माहिती दडविण्याच्या हेतुने संबंधित उपविभागात झालेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचार यावर पांघरुन टाकण्याच्या हेतुने व संबंधित अधिकाऱ्यांची पाठराखन करण्यासाठी करण्यात आलेले आहे व अपिल प्रलंबित असतांनाच्या कालावधीत ज्यांच्या कारकिर्दीविषयी वरील माहिती अर्ज दाखल केला आहे ते सेवानिवृत्त झाले असल्यामुळे, आता त्या माहितीची उपयोगिता फारशी नाही. मात्र कार्यालयात उपलब्ध असलेले कागदपत्रे या विषयी तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना जाणीव असतांनाही जाणुनबूजुन माहितीचा अर्ज सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उमरखेड यांना हस्तांतरीत करण्यात आला. वरील सर्व प्रकार माहिती अधिकार कायदयाच्या मुळ भावनेच्या विरुध्द असुन गंभीर स्वरुपाची आर्थीक अनियमितता झाकण्याच्या हेतुने हा सर्व प्रकार करण्यात आला असल्याचा गंभीर आक्षेप श्री.बोरेले यांनी त्यांचे लेखी व मौखीक निवेदनात केला आहे. तसेच अवलोकनाचा दिलेला प्रतिसाद हा देखील व्दितीय अपिल अर्ज दाखल केल्यानंतर सादर करण्यात आला असुन ही संपुर्ण प्रक्रिया ही कलम ७(९) अन्वये चुकीची असल्याचे अपिलार्थी यांनी नमुद केले आहे. ही बाब



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

लक्षात घेता अपिलार्थी यांनी सादर केलेला व्दितीय अपिल अर्ज पुर्णत: मंजुर करीत माहिती अर्जात नमुद सार्वजनिक बांधकाम उपविभाग उमरखेड येथील तत्कालीन उपविभागीय अधिकारी श्री.वानखडे यांचे कारकिर्दीत हाताळलेल्या मुद्दा क्र. १ ते ५ यातील कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली संपुर्ण माहिती ही अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करण्यात यावी. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना कलम ६(३) अन्वये माहिती अधिकार अर्ज हस्तांतरीत केल्यानंतर त्यांचेव्दारे कुठलाही प्रतिसाद मुदतीत देण्यात आला नाही. तसेच कलम ७(९) चे अवलोकनाचा प्रतिसाद देखील व्दितीय अपिल दाखल केल्यानंतर दिला असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेत कलम ७(१) चा भंग झाला असुन, कलम ७(६) नुसार वरील माहिती विनामुल्य मिळण्यास अपिलार्थी पात्र ठरतात. मात्र माहितीची विस्तृतता लक्षात घेता संपुर्ण नस्ती प्रदान करण्याऐवजी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचेशी संपर्क व समन्वय साधुन संकलीत केलेली संपुर्ण माहिती त्यांना अवलोकनार्थ दयावी व त्यानंतर त्यांनी चिन्हांकित केलेली त्यांना अपेक्षित असणारी जोडपत्र अ च्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखावर २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विनामुल्य देण्यात यावी.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग यांचे व अमरावती विभाग, अमरावती

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ३०.०६.२०२३**

जावक क्रमांक 3082 दिनांक 23/06/2023

**निर्गमित केले**
23 AUG 2023